# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी
# जिल्हा - ठाणे.

प्रसिध्दीसाठी

दिनांकः- ०३/०१/२०२५.

**क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व भारतीय स्त्री मुक्ती दिनाचा कार्यक्रम महानगरपालिकेच्या वतीने साजरा**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व भारतीय स्वी मुक्ती दिनानिमित्त दि.०३/०१/२०२५ रोजी स्व. राजय्या गाजेंगी सांस्कृतीक कला भवन, कोंबडपाडा येथे सकाळी. ११.०० वा. दिप प्रज्वलन करुन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अजय वैद्य यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

भारतातील प्रथम शिक्षिका व प्रथम मुख्याध्यापिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या आजच्या १९४ व्या जयंतीनिमित्ताने स्व. राजय्या गाजेंगी सांस्कृतीक कला भवन, कोंबडपाडा येथे सकाळी. १० ते दु. २ या वेळेत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्ताने महिलांची आरोग्य तपासणी, सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारीत एकांकिका व पोवाडा तसेच महिलांकरीता असलेल्या योजनांची माहिती या कार्यक्रमात देण्यात आली.

या कार्यक्रमात मा.प्रशासक तथा आयुक्त यांनी मनोगत व्यक्त केले की, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी महिलांसाठी स्त्री शिक्षणाचा पाया रचला, महिलांना सन्मानाची वागणूक दिली अशा विविध कार्याबाबत माहिती दिली. तसेच महानगरपालिकेच्या वतीने आयोजीत करण्यात आलेल्या महिलांचे आरोग्य तपासणीत सर्व महिलांना आरोग्याची तपासणी करुन निरोगी राहण्याचा सल्ला दिला. तसेच या वेळी मा. प्रशासक तथा आयुक्त महोयांनी विशेष नमुद केले की, वर्तमान पत्रात प्रसिध्द झाले आहे की, oxford University यांनी सुध्दा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाने शिष्यवृत्ती जाहिर केलेली आहे. त्यामुळे ही आपल्या देशासाठी फ़ार मोठ्या अभिमानाची गोष्ट आहे.

याप्रसंगी मा. अति आयुक्त श्री. देविदास पवार व श्री. विठ्ठल डाके, उप-आयुक्त, श्री. बाळकृष्ण क्षिरसागर, श्रीम. प्रणाली घोंगे, डॉ. अनुराधा बाबर, मा. शहर अभियंता श्री. जमिल पटेल, सहा. आयुक्त (समाजकल्याण) श्री. मिलींद पळसुले, आरोग्य विभाग प्रमुख श्री. जे. एम. सोनावणे, डॉ. बुशरा सय्यद, डॉ. संदिप गाडेकर (MOH), डॉ. अर्चना पवार जिल्हा वैद्यकीय अधिकारी, समाज कल्याण विभाग प्रमुख श्री. नितेश चौधरी, श्री. सिध्दार्थ मोरे प्रमुख वक्ते व महानगरपालिकेचे महिला कर्मचारी व अधिकारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

(श्रीकांत परदेशी)
माहिती व जनसंपर्क अधिकारी
भिवंडी नि. शहर महानगरपालिका